**नि.फौ.ख.क्र. २८७/२०२२**

**सरकार –वि– तुळशीराम चौधरी**

**निशाणी क्र. ३६**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ ची शपथेवर जबानी.**

नांव – माणिक नारायण चौधरी

वय – ४७

धंदा – शेती

राहणार – इंदिरानगर, पारेगाव, ता. चांदवड, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. मला दि.२३.०७.२०२२ रोजी पोलीसांनी पंचनाम्यासाठी घटनास्थळी बोलाविले होते. तो पंचनामा भांडणासंदर्भातील होता. माझ्यासोबत दुसरे पंच निवृत्ती नारायण चौधरी देखील होते. घटनास्थळ पंचनाम्यासाठी मी इंदिरानगर येथील गट नं. ६ मध्ये गेलो होतो. घटनास्थळ मला पोलीस व साक्षीदार यशोदा चौधरीने दाखवले. यशोदा चौधरीने सांगितले की तिच्या मुलाला फावड्याने मारले. घटनास्थळी तुडवा–तुडव झाली होती व रौंदळ झाल्याच्या खुणा दिसत होत्या. पोलीसांनी माझ्यासमक्ष फावडे जप्त केले व त्यानुसार माझ्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. ते आर्टीकल अ कडील फावडे दाखवल्यास मी ओळखू शकतो. मला आता दाखवलेले फावडे तेच आहेत.

२. घटनास्थळाच्या पूर्वेला भिका ढुमसे यांचे क्षेत्र, पश्चिमेला चौधरीचे क्षेत्र, उत्तरेला शांताराम चौधरीचे क्षेत्र, दक्षिणेला नारायण चौधरीचे क्षेत्र आहे. घटनास्थळ पंचनामा पोलीसांनी माझ्यासमक्ष तयार केला. त्यावर मी वाचून

सही केली. मला आता तो घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर पंच क्र. १ म्हणून माझी सही आहे. त्याला **निशाणी ३७** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. व्ही. एस. पाटील यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

३. हे म्हणणे खरे आहे की आरोपी व आम्ही एकमेकांशी बोलत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी व साक्षीदार यशोदा चौधरी यांच्यासोबत माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की मला आज न्यायालयात साक्ष देण्यासाठी फिर्यादीने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी व आरोपीमध्ये पूर्वीपासून शेतीच्या वाटपावरुन वाद चालू आहेत.

४. साक्षीदार लता चौधरी माझी नात्याने भावजय लागते. घटनास्थळ कोणाच्या मालकीचे आहे यासंदर्भात मी उतारा पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नं. ६ च्या ७/१२ उताऱ्यावर केवळ फिर्यादीचेच नाव नमूद आहे. पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी लेखी नोटीस दिली नव्हती. पंचनाम्यासाठी मला कोणत्या पोलीसांनी बोलाविले होते त्यांचे नाव मला सांगता येणार नाही. मी घटनास्थळ पंचनाम्यासाठी गेलो तेव्हा तेथे एक पोलीस होते.

५. घटनास्थळ पंचनाम्यावरील दुसरे पंच निवृत्ती नारायण चौधरी हे फिर्यादीचे चुलत भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की आर्टीकल ए कडील फावडे यशोदा चौधरीने पोलीसांना दिले. पोलीसांनी पंचनाम्यासाठी काय–काय साहित्य सोबत आणले होते ते मला सांगता येणार नाही. मी पंचनाम्यावर सही केली तो कागद वहिचा होता. साक्षीदार स्वःहून सांगतो की

त्याने पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की मी ज्या सह्या केल्या त्या वडनेर भैरव पो.स्टेशनला केल्या. पंचनाम्यासाठी मी दुपारी ०१:०० वाजता गेलो होतो. माझ्या घरापासून घटनास्थळ १०० ते १५० फुटांवर आहे. पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी तोंडी बोलाविले होते. दुसरा पंच निवृत्ती चौधरीचे घर घटनास्थळापासून २०० फुटांवर आहे. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाच्या आजूबाजूला मी चतुःसिमेमध्ये जी नावे सांगितली आहेत त्यांची घरे आहेत. घटनास्थळ पंचनामा किती वाजता चालू होऊन किती वाजता संपला ते मला सांगता येणार नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की मी व दुसरा पंच निवृत्ती चौधरी आज सोबत आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी लिहिलेल्या पंचनाम्यावर मी केवळ सही केली. हे म्हणणे खरे नाही की साक्षीदार यशोदाबाई चौधरी हिच्या सांगण्यानुसार पंचनामा केला व त्यातील मजकूर लिहिला. हे म्हणणे खरे नाही की पंचनाम्यातील मजकूर यशोदाबाईच्या सांगण्यानुसार लिहिला व मी केवळ त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी व साक्षीदार माझे जवळचे नातेवाईक असल्यामुळे त्यांना मदत करण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.11.14 15:25:22 +0530

**दि. १४.११.२०२५**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**